दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजय भांगे

बीड/महाराष्ट्र | शनिवार दि.१६ नोव्हेंबर २०२४ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक -८५ | पाने ४ | किंमत ४ रुपये

## देवेंद्र फडणवीसांनी राजकारणातील माझे स्थान ओळखावे

**मुंबई**-शरद पवार यांनी पाठवलेल्या पत्रामुळे २०१९ मध्ये राज्यामध्ये राष्ट्रपती राजवट लागू झाली असल्याचा दावा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला होता. त्यांच्या या वक्तव्यावर आता शरद पवार यांनी पलटवार केला आहे. तेव्हा राज्यात मी सत्तेत नव्हतो, माझ्याकडे काही संस्थेचे सदस्यत्व देखील नव्हते. तरी देखील मी सांगितल्यावर राष्ट्रपती राजवट लागू झाली, याचा अर्थ त्यांनी ओळखला पाहिजे. त्यांनी राज्यातील राजकारणातील माझे स्थान काय आहे? हे ओळखावे असा पलटवार शरद पवार यांनी केला आहे.वाट्टेल ते होऊ द्या, पण फडणवीसांना सत्ता मिळू देणार नाही:पवारांचा ठाम निर्धार; पैसे ओतून माणसे विकत घेण्याचा प्रकार सुरू असल्याची टीकामुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका दैनिकाला दिलेल्या मुलाखतीत मागील निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर राज्यात राष्ट्रपती राजवट लागू होण्यामागे शरद पवार यांचे पत्र असल्याचा दावा केला होता. त्यावर शरद पवार यांनी हा पलटवार केला आहे. या माध्यमातून शरद पवार यांनी देवेंद्र फडणवीस यांनी केलेला दावा फेटाळून लावला असल्याचे आता बोलले जात आहे.

### केज विधानसभा मतदारसंघात डॉ.प्रितमताई मुंडे यांचा झंझावाती दौरा

# आपल्या हक्काची सत्ता आणण्यासाठी महायुतीला विजयी करा-प्रितमताईंचे मतदारांना आवाहन


## नमिता मुंदडा यांना दिलेले प्रत्येक मत पंकजाताईंचे बळ वाढवणारे

**केज | प्रतिनिधी**

राज्यात आपल्या हक्काची असलेली महायुतीची सत्ता आणण्यासाठी महायुतीच्या उमेदवार नमिता मुंदडा यांच्या पाठीशी मतदानरुपी आशीर्वाद उभे करा, त्यांना दिलेले प्रत्येक मत हे पंकजाताई मुंडे यांचे बळ वाढवणारे आहे. महायुती सरकारच्या माध्यमातून पुढचे पाच वर्षे मतदार संघाची इमाने इतबारे अविरत सेवा करू अशी ग्वाही माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी मतदारांना दिली. केज आणि अंबाजोगाई तालुक्यातील प्रचार दौऱ्यानिमित्त विविध गावांना भेटी देऊन मतदारांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या.

केज विधानसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या उमेदवार नमिता मुंदडा यांच्या प्रचारानिमित्त डॉ. प्रितमताई मुंडे यांनी सलग दोन दिवस झंझावाती दौरा करत मतदारसंघ पिंजून काढला. यादरम्यान ठिकठिकाणी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. महायुतीच्या उमेदवार नमिता मुंदडा, अक्षय मुंदडा यांच्यासह स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते यादरम्यान उपस्थित होते.

होत असलेली विधानसभा निवडणुक ही दुरगामी परिणाम करणारी आहे. आपल्याला केवळ आपला प्रतिनिधी निवडायचा नसून येणाऱ्या पिढीचे भवितव्य घडवणारा, त्यांच्या भवितव्याला योग्य दिशा देणारा हक्काचा आमदार आपल्याला निवडायचा असल्याचे डॉ. प्रितमताई मुंडे म्हणाल्या. राज्यातील सर्वसामान्यांच्या हितासाठी लाडकी बहीण, वीज बिल माफी, मोफत अन्नधान्य' अशा विविध लोकोपयोगी योजना राबवणारे महायुतीचे सरकार आपल्याला पुन्हा एकदा सत्तेत आणायचे आहे, आणि म्हणून आपल्या हक्काचा उमेदवार आणि हक्काची सत्ता आणण्यासाठी, मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुन्हा एकदा महायुतीचा उमेदवार विधानसभेत पाठवा, येणारे पाच वर्षे आपल्या विकासाचे आणि उज्वल भवितव्याचे असतील.मागील पाच वर्षांपासून आम्ही या मतदारसंघासाठी प्रामाणिकपणे काम करत आहोत, पुढील काळात देखील आपल्या सेवेत खंड पडू देणार नाही अशी ग्वाही सर्वांना देते' अस डॉ. प्रितमताई मुंडे आपल्या भाषणादरम्यान म्हणाल्या.



## परळी तालुक्यातील पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांचा विधानसभा निवडणुक मतदानावर बहिष्कार

**परळी | प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांचा त्यांच्या गेल्या काही वर्षांपासून थकलेल्या बीलांच्या व इतर प्रश्नांमुळे परळी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुक मतदानावर पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांनी बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे लोकशाहीच्या या सर्वात मोठ्या उत्साहात पत्रकार सहभागी होणार नाहीत. आज दिनांक १५ नोव्हेंबर २०२४ रोजी शहरातील लोकनेते गोपीनाथराव मुंडे पत्रकार भवन येथे विविध वर्तमानपत्रांचे संपादक पत्रकार आदी उपस्थित होते यावेळी गेल्या अनेक वर्षापासून विविध राजकीय पक्षांच्या नेत्याकडे पत्रकारांच्या जाहिरातीचे बीले थकलेली आहेत. जाहिरात बीलां संदर्भात वर्तमानपत्रांच्या संपादकांचा पत्रकारांना सतत मागोवा घेण्यासंदर्भात पाठपुरावा केला जातो. परंतु बीले काही दिले जात नाहीत. लोकसभा निवडणुकीतही आश्वासन मिळाले परंतु आता विधानसभा निवडणुकीचा प्रचारही अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेला आहे. अद्याप पत्रकारांची दखल घेण्यात आलेली नाही. त्यामुळे उद्विग्न होऊन सर्व संपादक व पत्रकारांनी परळी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा एकमुखी ठराव घेतलेला आहे. यामध्ये पत्रकारांचे कुटुंबीयही सहभागी आहेत. या निवेदनावर संपादक आत्मलिंग शेटे, ज्येष्ठ पत्रकार रामप्रसाद शर्मा, संपादक रानबा गायकवाड, ज्येष्ठ पत्रकार धनंजय अरबुने, संपादक मोहन वाव्हळे, पत्रकार प्रा. प्रवीण फुटके , प्राध्यापक रवींद्र जोशी, संपादक बालासाहेब फड,पत्रकार धनंजय आढाव, पत्रकार प्रकाश चव्हाण, पत्रकार जगदीश शिंदे, पत्रकार दत्तात्रय काळे, पत्रकार माणिक कोकाटे, पत्रकार समीर इनामदार, पत्रकार पद्माकर उखळीकर,पत्रकार महादेव शिंदे, पत्रकार धीरज जंगले, पत्रकार प्रा. दशरथ रोडे, पत्रकार किरण धोंड, पत्रकार विकास वाघमारे, पत्रकार श्रीराम लांडगे, पत्रकार गणेश आदोडे, संपादक बालाजी जगतकर पत्रकार भगवान साकसमुद्रे, संपादक बालाजी ढगे, संपादक कैलास डुमणे, संपादक अभिमान मस्के,पत्रकार संतोष बारटक्के, पत्रकार महादेव गीते,पत्रकार बाबा शेख, संपादक नितीन ढाकणे, पत्रकार अमोल सूर्यवंशी, पत्रकार प्रकाश वर्मा, पत्रकार शेख मुकरम, पत्रकार संदीप मस्के, पत्रकार विजय रोडे, पत्रकार बालासाहेब मुजमुले आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## प्रज्ञासूर्य डॉ.बाबासाहेबांना घडविण्यात सुभेदार रामजी बाबांचा मोलाचा सहभाग-कॅप्टन राजाभाऊ आठवले

### महामानव सार्वजनिक वाचनालयात जयंतीदिनी विनम्र अभिवादन




**बीड | प्रतिनिधी**

प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन घडविण्यात त्यांचे वडील सुभेदार रामजी बाबा सकपाळ यांच्या निर्भिड वृती, स्वाभिमान व करडी शिस्त या बालपणीच्या संस्काराचा अधिक प्रभाव राहिला असे प्रतिपादन समता सैनिक दलाचे मेजर कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी केली.

महामानव सार्वजनिक वाचनालय, (विद्यागर नाना कॉम्प्लेक्स) धानोरा रोड, बीड येथे सभेदार रामजी बाबा सकपाळ, वस्ताद लहुजी साळवे व भारताचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या संयुक्त जयंतीदिनी विनम्र अभिवादन प्रसंगी अध्यक्षपदी कॅप्टन राजाभाऊ आठवले लाभले होते तर वाचाल तर वाचाल चे डी.जी. वानखेडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमास महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले, से.नि. जिल्हा प्रबंधक (एलआयसी) यु. एस. वाघमारे व आयु. हनुमंत कांबळे से.नि. सहकार उपनिबंधक यांची प्रमुख उपस्थिती होती. लहानपणीच अभ्यासाची व वाचनाची गोडी लागावी म्हणून भिवाला मागेल ते पुस्तक सुभेदार रामजी बाबा हे कोणत्याही परिस्थितीत उपलब्ध करून देत असत. म्हणूनच त्यांना पुढील जीवनात ग्रंथ प्रेम व ग्रंथाचा सहवास लाभला असे डी.जी. वानखेडे यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी आयु. जी. एम. भोले यांनी वस्ताद लहुजी साळवे व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कार्याबद्दल माहिती दिली. तसेच के.एस. वाघमारे यांनी ही आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमास दादाराव गायकवाड, आशाताई विद्यागर, रेश्मा विद्यागर, मोहिनी विलास शेटे व बालकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयु. राऊत डी.एम. यांनी करून सरणयतयाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## नागपुरात २५०० गुंतवणूकदारांची कोट्यवधींची फसवणूक;ठगबाज फरार

**नागपूर (वृत्तसंस्था)**

नागपूर शहरात अडीच हजार गुंतवणूकदारांची कोट्यवधींची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आरोपीने दुप्पट पैसे आणि १० टक्के व्याज अशा आकर्षक ऑफरने हजारो लोकांना आकर्षित करत कोट्यवधी रुपये उचलले आणि कुटुंबासह फरार झाला. नंदनवन पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या या घटनेने गुंतवणूकदारांमध्ये खळबळ उडाली आहे.आरोपी किशोर प्रभाकर अमृतकर (४५) याने बगडगंज परिसरात किराणा दुकान चालवित असताना, गेल्या काही वर्षांपासून लोकांकडून गुंतवणूक घेतली होती. सुरुवातीला त्याने दिवाळीसारख्या सणासुदीत गुंतवणूकदारांना रक्कम परत करून विश्वास संपादन केला होता. मात्र, यावर्षी अचानक घराला कुलूप लावून फरार झाल्याने फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी याप्रकरणी तातडीने गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध घेण्यासाठी पथक स्थापन केले आहे. आरोपीने एकूण १ कोटी ८५ लाख रुपये गोळा केल्याचे अनुमान आहे, आणि या फसवणुकीची संख्या वाढून २५०० हून अधिक गुंतवणूकदार प्रभावित होण्याची शक्यता आहे. या प्रकरणात आरोपीने घेतलेल्या रकमेचा पुढील तपास सुरू असून, त्याने ती रक्कम कुठे गुंतवली हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेमुळे नागपुरातील गुंतवणूकदारांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## संकेत मोदी यांनी पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारार्थ अंबाजोगाई शहर काढले पिंजून

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहर हे राजकिशोर मोदी व मोदी कुटुंबाला मानणारे शहर आहे.त्यांच्या आशिर्वादानेच मोदी हे मागील अनेक वर्षांपासून अंबाजोगाई नगर परिषदेच्या माध्यमातून शहरवासीयांची सेवा करत आहेत.आपल्या पित्याचा समाजसेवेचा वसा त्यांचे सुपुत्र संकेत मोदी हे पुढे चालवताना दिसून येत आहे.

सध्या राज्यात विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी अंतिम टप्प्यात येत आहे. अंबाजोगाई केज विधानसभा मतदार संघात देखील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार पृथ्वीराज साठे यांचा प्रचार देखील जोर धरू लागला आहे. साठे यांच्या प्रचारासाठी संकेत मोदी यांनी आपल्या अनेक सहकाऱ्यांसह संपूर्ण अंबाजोगाई शहर पिंजून काढले आहे.अंबाजोगाई शहरातील प्रभाग क्रमांक १ पासून ते प्रभाग क्रमांक १४ मधील सर्व भागात जाऊन तेथील प्रत्येक नागरिकांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन साठे यांना मतदार करण्याचे आवाहन ते करत आहे.

प्रत्येक भागातील नागरिकांनी संकेत मोदी व त्यांच्या सहकार्यांचे स्वागत मोठ्या उत्स्फूर्तपणे केले. भेटी दिलेल्या भागामध्ये संकेत मोदी यांच्या बरोबर प्रथमेश पृथ्वीराज साठे , गणेश मसने, सुधाकर टेकाळे, सचिन जाधव, अनुप जाजू, महेश कदम, खलील जाफरी, अंकुश हेडे, दत्ता सरवदे, शाकेर काझी, प्रणव लोढा, गौरव उपाध्याय, कन्हैय्या सारडा, अमजद पठाण, अस्लम शेख , जावेद गवळी, रफिक गवळी, आकाश कऱ्हाड, अजीम जरगर, रोहित देवकर, साईराज देवकर, राजेश चव्हाण, प्रसाद कोंबडे, शुभम लखेरा, साईराज धोत्रे यांच्यासह अनेक सहकारी सहभागी झाले होते.



## स्कीमर्स फॅमिली पनवेल उरण तर्फे आयोजित रक्तदान शिबिराला उत्तम प्रतिसाद


**उरण | विठ्ठल ममताबादे**

राज्यात रक्ताचा होत असलेला तुटवडा, रुग्णांचे रक्ता अभावी होणारे मृत्यू आदी गोष्टी लक्षात घेउन रक्तदाना बाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने तसेच गोर गरिबांना रक्त वेळेत उपलब्ध व्हावे या अनुषंगाने स्कीमर्स फॅमिली पनवेल उरण या सामाजिक संस्थेतर्फे श्री साईबाबा मंदिर,साईनगर, वहाळ,पनवेल येथे भव्य दिव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ३५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी श्री साई मंदिर वहाळचे संस्थापक रवीशेठ पाटील, सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत मुंबईकर, स्कीमर्स फॅमिली पनवेल उरण या सामाजिक संस्थेचे अमित पाटील,अनिकेत पवार, मनिष पाटील, आकाश कोळी, आकाश उलवेकर, प्रतीक पाटील, मंदार सुर्वे, रोशन म्हात्रे, संकेत पाटील,सचिन, विनय कोळी कौस्तुभ गोजे,जितेश म्हात्रे ,आदी पदाधिकारी सदस्य उपस्थित होते. ४० सदस्य असलेल्या स्कीमर्स फॅमिली या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून आजपर्यंत अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले आहेत. सामाजिक बांधिलकी जपत दरवर्षी भव्य दिव्य असे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी रक्तदान शिबिराला उत्तम प्रतिसाद मिळाल्याचे स्कीमर्स फॅमिली संस्थेचे सदस्य अमित पाटील यांनी सांगितले.या प्रसंगी उपस्थित असलेले श्री साई मंदिर वहाळचे संस्थापक रवीशेठ पाटील यांनी सदर उपक्रमांचे कौतुक करत सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी असेच चांगले कार्य पुढेही सुरु ठेवून समाजकार्य करावे असे सांगून शुभेच्छा दिल्या. एकंदरीत स्कीमर्स फॅमिली पनवेल उरण या सामाजिक संस्थेतर्फे आयोजित रक्तदान शिबिराला जनतेचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे.



## संपादकीय

# नकारात्मकता दूर ठेवा...



‘मन चिंती ते वैरी न चिंती’ हा विचार अगदी खरा आहे. आपल्या मनातील सकारात्मक चांगले विचार जसे आपल्याला आपल्या ध्येयापर्यंत नेऊ शकतात. तसेच मनातील वाईट नकारात्मक विचार ध्येयापासून दूर ही नेऊ शकतात. हे नकारात्मक विचार म्हणजेच आपल्या मनातील वाईट विचार, आपण आपल्या मनाशी साधलेला हा दुःसंवाद, अनेकदा आपण स्वतः सोबत दुःसंवाद साधत असल्याची जाणीव देखील आपल्याला नसते. वर्षानुवर्षाच्या सवयीमुळे तो आपला अविभाज्य घटक बनतो. आपण त्या नकारात्मक भावनांमध्येच रमतो. त्या विचारांना अधिक वेळ कुरवाळत राहतो. अशा नकारात्मक विचारांमुळे आपले जीवन असाध्य बनू शकते, पण त्यावर निश्चितपणे तुम्ही मात करू शकता.

नकारात्मक संवादाला विचारांना तुम्ही कायमचे काढून टाकू शकत नाही, पण त्यापासून चार पावले स्वतःला मागे ठेवू शकता. नकारात्मक विचार करणाऱ्या, सतत रडगाणी गाणाऱ्या लोकांपासून शक्य तितकं लांब राहा. कारण त्यांच्या सहवासात आपले विचारही नकारात्मक होण्याची शक्यता असते. दिवसाची सुरुवात चांगल्या विचारांनी करा. मन प्रसन्न असले की छान आणि उत्साही वाटते. हा उत्साह दिवसभर तुमची साथ करेल. आनंदी आणि उत्साही राहणं आपल्या मानसिक प्रगतीचं लक्षण आहे. ज्याच्याकडे हे दोन्ही गुण आहेत, अशी व्यक्ती कधीच नैराश्याच्या अंधारात चाचपडत नाही. नकारात्मक विचार करण्यामुळे मनाची गाडी त्या जागीच गोल गोल फिरत राहते. विचारांमध्ये आपण गुरफटत जातो. आपले मन इतर गोष्टीकडे वळवले तर विचारांची शृंखला तुटेल. म्हणूनच मोकळ्या हवेत फिरायला जा, निसर्गाचा आंनद घ्या, गाणी ऐका, चित्र काढा, आपल्या आवडीचे काम करा, आपले छंद जोपासा. मनान कायम तरुण राहा, त्यामुळे मनाला शांती लाभेल. शरीरात उत्साह संचारेल, तुमच्या जगण्याला नवी उभारी मिळेल.

नकारात्मक आणि सहन न करता येण्यासारख्या भावना मनात दडपून टाकण्यापेक्षा त्या नियंत्रित करून व्यक्त कराव्यात. त्याचे युक्तीपूर्वक निराकरण करावे. त्यामुळे नात्यांमधील दुरावा कमी होऊन सुधारणा होते. टीव्हीवर दिवसरात्र दाखवल्या जाणाऱ्या सासू-सुनेच्या रटाळ मालिका, तेच ते फॉम्युले असणारे टीव्हीवरील कार्यक्रम, व्हाट्सअॅप, फेसबुकवरील नकारात्मक मेसेज या सर्व गोष्टींपासून दूर राहा. कारण या रटाळ गोष्टींमधूनही नकारात्मक विचार मनात निर्माण होतात. त्याऐवजी आपला वेळ चांगले कार्यक्रम पाहण्यात, चांगली पुस्तके वाचण्यात घालवा. चांगले व्याख्यान ऐका. एक दोन चांगले शब्द ऐकण्यास मिळाले, प्रेरणादायी विचार कानावर पडले तर आयुष्यात त्याचा नक्की उपयोग होईल. आपले विचार आपल्याला घडवत असतात.

शेक्सपिअरने एक ठिकाणी लिहिलंय की, कुठलीतरी वस्तू चांगली की वाईट नसते, आपल्या नजरेचा दृष्टिकोनच त्या वस्तूचा भलेबुरेपणा ठरवत असतो, अर्थात हा दृष्टिकोन म्हणजेच आपले विचार होय. यामुळे साहजिकच आपल्याकडे सकारात्मक विचारसरणी असल्यास कुठलीही स्थिती आपल्याला नैराश्याच्या गर्तेत ढकलू शकणार नाही. आपल्याला सर्वात जास्त भीती अपयशाची वाटते. त्यामुळे आपण चांगल्या संधी सोडून देतो. आपले पाय मागे खेचणारी ही भीती मनातून काढून टाका. अपयश आल्यानंतर निराश न होता आपल्यातील चुका, कमतरता जाणून घ्या, त्यावर मात करा. सर्व गोष्टींना धाडसाने सामोरे जा. आपले ध्येय गाठण्यासाठी नव्याने सज्ज व्हा. आलेल्या संधी न दवडता त्या संधीचे सोने करा. काही वेळेला अशा काही घटना घडतात की चांगल्या व्यक्ती पण भटकतात. नकारात्मक विचारांनी ग्रासून चुकीच्या मार्गाला लागतात. व्यसनांच्या आहारी जातात. तुमच्या जवळची व्यक्ती असेल तर डॉक्टर, समुपदेशकाची मदत घेऊन त्यांना सहकार्य करा. नकारात्मक विचारांनी आपल्या मनात प्रवेश केल्यामुळे राग, द्वेष उत्पन्न होतात. अशा दूषित विचारांचा त्याग करून सकारात्मक विचारसरणी ठेवा.

# दुःखातून बाहेर काढण्यासाठी हसणे ही सर्वात मोठी शक्ती

जागतिक हास्य दिनाची स्थापना १९९८ मध्ये करण्यात आली आणि पहिला उत्सव १० मे १९९८ रोजी मुंबई, भारत येथे साजरा करण्यात आला, ज्याची व्यवस्था जगभरातील हास्य योग चळवळीचे संस्थापक डॉ. मदन कटारिया यांनी केली होती. डॉ. कटारिया भारतातील एक फॅमिली डॉक्टर, चेहऱ्याच्या फीडबॅक हायपोथिसिस पासून प्रेरणा घेऊन ते म्हणाले की, चेहऱ्याच्या हालचालींचा माणसाच्या भावनांवर प्रभाव पडतो. चेहऱ्यावरील अभिप्राय गृहीतकाने हशा योग चळवळ सुरू करण्यास प्रेरित झाले होते, ज्यात असे मानले जाते की एखाद्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरील हावभावांचा त्यांच्या भावनांवर परिणाम होऊ शकतो. जागतिक हास्य दिन साजरा करणे हे जागतिक शांततेसाठी एक सकारात्मक प्रकटीकरण आहे आणि हास्याद्वारे बंधुता आणि मैत्रीची जागतिक जाणीव निर्माण करण्याचा हेतू आहे. हा बहुतेक वेळा हसण्याच्या एकमेव उद्देशाने सार्वजनिक ठिकाणी लोकांच्या मेळाव्याद्वारे साजरा केला जातो. त्याची लोकप्रियता झपाट्याने वाढली आहे. लाफ्टर योग चळवळीसह आता ११५ हून अधिक देशांमध्ये हजारो लाफ्टर क्लबची गणना केली जात आहे आणि आता तो जगभरात साजरा केला जातो.




निरोगी राहण्यासाठी केवळ निरोगी आहार आणि व्यायाम करणे महत्त्वाचे नाही तर तणावमुक्त जीवन जगणे देखील महत्त्वाचे आहे. तणावामुळे अनेक आजारांचा धोका अनेक पटींनी वाढतो आणि त्यामुळेच लोक तणाव कमी करण्यासाठी लाफ्टर थेरपीसारख्या तंत्राची मदत घेतात. लोकांमध्ये एकता आणि सद्भावना वाढवणे तसेच लोकांमध्ये आनंद वाटून घेणे हा दिवस साजरा करण्यामागे उद्देश आहे. एवढेच नाही तर हसण्याने तुमचे आरोग्यही निरोगी राहते. म्हणूनच अनेक लोक सकाळी किंवा संध्याकाळी उद्यानांसारख्या ठिकाणी जमतात आणि जोरात हसतात. तणाव कमी करण्यासाठी हसणे फायदेशीर ठरते, तुमचा मूड चांगला राहतो. तसेच मानसिक आरोग्य देखील निरोगी राहते आणि सकारात्मक उर्जा वाढते. त्यामुळे मित्र, सहकारी आणि कुटुंबातील सदस्यांसोबत हसण्यानेही भावनिक नाते संबंधात सकारात्मकता येते व शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. कारण ते तणाव संप्रेरक कमी करून तुमचा कामावरचा फोकस ही वाढतो त्यामुळे आनंदी हार्मोन्स बाहेर पडतात व तुम्हाला फ्रेश वाटते. हसल्याने आयुष्य चार पट वाढतं. प्रत्येकाच्या आयुष्यात अनेक समस्या असतात पण हसल्याने त्या समस्या कमी होण्यास मदत होते. अशा परिस्थितीत हा दिवस अधिक खास बनवण्यासाठी, तुम्ही तुमच्या मित्रांना काही हास्य आणि प्रेमाने भरलेले संदेश पाठवू शकता.

हसणं हे नैसर्गिक ताण कमी करणारं आहे. एक चांगले हसणे एंडोर्फिन सोडते, ती फील-गुड रसायने जी तणाव हार्मोन्सचा सामना करतात. अधिक रिलॅक्स टीम हा एक आनंदी आणि निरोगी टीम असते. टीम बिल्डिंगपासून ते ताणतणाव दूर करण्यापर्यंत आणि चांगल्या समस्या सोडविण्यापर्यंत चांगले हास्य हे चांगली उत्पादकता वाढवू शकते. हसणं किंवा हास्य शेअर केल्याने नातं आणि मैत्रीची भावना निर्माण होते. यामुळे आपलेपणाची भावना वाढते आणि टीममधील संबंध दृढ होतात. कोणत्याही दुःखातून किंवा दुःखातून बाहेर काढण्यासाठी हसणे आणि आनंद ही सर्वात मोठी शक्ती आहे. हसण्यामुळे तणाव कमी होतो आणि अधिक निवांत वातावरण वाढते. यामुळे विचारांचा मुक्त प्रवाह होऊ शकतो आणि क्रिएटिव्ह विचारांना चालना मिळू शकते. ज्यामुळे समस्या सोडविणे आणि नाविन्यपूर्ण काम होऊ शकते. हसणे कठीण संभाषणादरम्यान तणाव कमी करू शकते आणि लोकांना नवीन कल्पनांसाठी उघडू शकते. हे विश्वास आणि सामंजस्य निर्माण करण्यात देखील मदत करू शकते. ज्यामुळे स्पष्ट संवाद आणि चांगले सहकार्य होते.

अभ्यासातून असे दिसून आले आहे की हसणे खरोखर उत्पादकता वाढवू शकते. एक निवांत आणि आनंदी टीम त्यांच्या कामात लक्ष केंद्रित आणि व्यस्त असण्याची शक्यता जास्त असते. हसणे हे एक नैसर्गिक रिलॅक्स तंत्र आहे. हे स्नायू सैल करण्यास, रक्तदाब कमी करण्यास आणि तणाव कमी करण्यास मदत करते. एक रिलॅक्स टीम आव्हाने हाताळण्यासाठी आणि दिवसभर एकाग्र राहण्यासाठी अधिक सुसज्ज असते. दिवसाच्या सुरुवातीला आपण हसणे किंवा हास्य शेअर केले तर ते उर्वरित कामाच्या दिवसासाठी सकारात्मक टोन सेट करते. ही सोपी कृती आशावादाची भावना वाढवते आणि आपल्या टीमला अधिक सकारात्मक दृष्टिकोनासह आव्हानांना सामोरे जाण्यास मदत करू शकते. आज बऱ्याच कार्यसंस्कृतींमध्ये सहकार्यांशी जवळीक साधणे आणि त्यांच्याशी जुळवून घेणे हा दिवसाची सुरुवात करण्याचा एक योग्य मार्ग आहे! तसं अजूनही काही ठिकाणी हसण्याचा विसर पडलेला दिसतो. लोक ऑफिसमध्ये धावत येतात आणि कामाला सुरुवात करतात आणि क्वचितच हसण्यासाठी एखादा क्षण शेअर करतात. पण विशेषत: दिवसाच्या सुरुवातीला हसायला विसरणे ही एखादी संधी गमावल्यासारखे आहे, असे मत प्रोफेशनल सर्टिफायड लाइफ कोच आणि नवी दिल्ली येथील कोकोवेव्ह कोचिंग इंटरनॅशनलचे सहसंस्थापक हनी गुध यांनी सुद्धा व्यक्त केले. सर्व हास्य प्रेमींना ऋजागतिक हास्य दिनाऋच्या हार्दिक शुभेच्छा!

# आत्मपरीक्षणाचा अभिजात क्षण


‘देशी वाङ्मयाच्या विकासाकडे ब्रिटिश सरकारांचे लक्ष नाही. इतकेच नाही तर आमच्या पुढाऱ्यांचेही लक्ष नाही. वाङ्मयविकास आणि वाचनविकास याबाबत राजकीय पुढारी अगदीच बेफिकीर आहेत. याकडे सर्वच पुढाऱ्यांचे इतके दुर्लक्ष आहे की, अशा सर्वांचे वेळोवेळी कान उपटण्यासाठी एक स्वतंत्र माणूस नियुक्त केला पाहिजे...’, मराठी भाषेसाठी आणि ती ज्ञानभाषा व्हावी यासाठी ज्यांनी आपली उभी हयात कापरासारखी जाळली त्या ज्ञानकोशकार श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी काढलेले हे उद्गार आहेत.मराठी भाषेला केंद्र सरकारने अभिजात भाषेचा दर्जा द्यावा, यासाठी महाराष्ट्र सरकारने नेमलेल्या तज्ज्ञांच्या समितीने सन २०१३ च्या मे महिन्यात आपला अंतिम अहवाल सादर केला होता. तेव्हा केंद्रात यूपीएचे सरकार होते. नंतर एनडीएचे सरकार आले. दोन्ही सरकारांनी मिळून ११ वर्षे सखोल अभ्यास केल्यानंतर कोट्यवधी लोकांची मायबोली असणाऱ्या प्राचीन मराठी भाषेवर ती अभिजात असल्याचे शिक्कामोर्तब झाले आहे. मराठीसोबत इतरही भाषा आहेत. मात्र, महाराष्ट्रासाठी आणि जगभरात पसरलेल्या लक्षावधी मराठी भाषकांसाठी हा आनंदाचा क्षण आहे. तो सजगपणे साजरा करायला हवा. स्वत: निर्भीड ज्ञानतपस्वी असणाऱ्या केतकरांनी ‘कान उपटणाऱ्या विद्वानांची’ जी गरज तेव्हा व्यक्त केली होती; तसे अलौकिक ज्ञानतपस्वी महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर झालेच नाहीत किंवा आधीही नव्हते, असे नाही. मात्र, त्यांची अशी नैतिक सत्ता निर्माण झाली नाही किंवा कोणत्याच राज्यकर्त्यांना एका विशिष्ट मर्यादेनंतर ज्ञानी मंडळींचे ऐकण्यात काहीही रस नसतो. शिवाय, एरवी ज्ञानी असणारी मंडळी



कधी नेत्यांचा सदरा पकडून मागे धावू लागतील, याचीही शाश्वती नसते. एका बाजूला मराठी भाषेला अभिजात दर्जा आणि दुसरीकडे, मराठीची टोकाची, सर्वांगीण दुरवस्था असे जे परस्परविसंगत चित्र आज निर्माण झाले आहे; त्याचा खरा दोष या सगळ्या कथित विद्वानांचा आणि भाषिक ऱ्हस्वदृष्टी असणाऱ्या मराठी जनतेचा आहे.केंद्र सरकार कधी एकदा अभिजात भाषेचा दर्जा देतेय आणि मुळात देतेय की नाही; अशी सांस्कृतिक धाप गेले दशकभर महाराष्ट्राला लागली होती. आता तरी महाराष्ट्राने हा दर्जा म्हणजे नवी सुरुवात मानून आपल्या मायमराठीच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी पुढच्या ५० वर्षांची कार्यक्रमपत्रिकाच बनवायला हवी. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे कसे वाढीव केंद्रीय अनुदान मिळेल, हे समजेलच. तमीळ आणि संस्कृत या अभिजात भाषा वगळता इतर भाषांवर केंद्राने मोकळ्या हाताने धनवर्षाव केलेला नाही, असे म्हणतात. मराठीचेही तसेच होईल का? अर्थात, रोज अब्जावधी रुपयांच्या योजना मंजूर होणाऱ्या महाराष्ट्रात मराठीसाठी पैसा नाही, हे कुणाला पटणार नाही. मग मुद्दा येतो तो आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळण्याचा किंवा देशातील इतर ‘अभिजात’ भाषाभगिनींच्या पंगतीत पाट मांडला जाण्याचा. या बरोबरीतली प्रतीकात्मकता हेच निमित्त साधून आपण नीट लक्षात ठेवायला हवी. तज्ज्ञांच्या समितीने मराठी भाषेचा इतिहास जवळपास अडीच हजार वर्षे मागे नेऊन अहवालात त्याची संगतवार मांडणीही केली. या समितीमध्ये दिग्गज भाषा वैज्ञानिकांची अनुपस्थिती जाणवणारी असली तरी दिवंगत अभ्यासक हरी नरके यांनी समितीचे काम नीट पार पडावे यासाठी खूप कष्ट घेतले. मात्र, या समितीच्या अंतिम अहवालात काही महत्त्वपूर्ण कमतरता व चुका राहिल्या आहेत. त्या आजही दुरुस्त झालेल्या नाहीत. केंद्र सरकारने या चुका पोटात घालून मान्यतेची मोहोर उमटविली आहे. आता तरी हा अहवाल पूर्णपणे निर्दोष करून मगच राज्य सरकारने तो दप्तरी दाखल करावा.कोणत्याही भाषेचा इतिहास चौफेर तपासणे किंवा तिला योग्य त्या श्रेणीत बसवणे; ही गंभीर ज्ञानप्रक्रिया आहे आणि हवी. भारतात या प्रक्रियेचे मागेच राजकियीकरण झाले आहे. राजकियीकरण व अभिनिवेश ही जुळी भावंडे असतात. त्यामुळेच, मराठी समाजाने अभिजात भाषेचा दर्जा मिळणे; हा उत्सवाइतकाच जबाबदारीचा क्षणही मानायला हवा. ही आनंददायी जबाबदारी आहे. ‘गाथासप्तशती’सारखा दोन हजार वर्षांपूर्वीचा पहिला ज्ञात मराठी ग्रंथ वाचताना मन आनंदाने आणि अभिमानाने मोहरून जाते. तिथपासूनचा मराठीचा अक्षुण्ण प्रवास केवढा संपन्न आहे! सातवाहनांपासून अलीकडे शिवकालोत्तर मराठ्यांच्या राज्यापर्यंत हिंदुस्थानचा बव्हंश भाग मराठी समाजाने आणि त्यामुळे मराठी भाषेने कधी ना कधी आपलासा केला. असा समृद्ध वारसा असणाऱ्या मराठी भाषेने आणि मराठी समाजाने खरे तर किती विजीगिषू, युयुत्सू असायला हवे. आज आपण तसे नाही आणि आपली भाषाही नाही. तसे आपण आणि आपली मायमराठी होण्यासाठी हा ‘अभिजात क्षण’ आपण कसे वापरतो; यावर सारे अवलंबून आहे. या निर्णयाच्या निमित्ताने ही प्रेरणा मराठी मातीत फुलून येऊ दे!

# लाडक्या योजनांसाठी सामान्यांना त्रास

अगदी साध्या कारणासाठी नोटरी करायची असेल तर आता त्यासाठी पाचशे रुपयांचा मुद्रांक वापरावा लागणार आहे काही दिवसांपूर्वीच खाद्य तेलाचे दर वाढले आहेत मद्यावरील उत्पादन शुल्क देखील वाढविण्यात आले आहे येत्या काळात आणखी कशा कशामध्ये करवाढ करुन राज्य चालविण्याची वेळ सरकारवर येईल हे आज सांगता येणे अवघड आहे इतके सरकारच्या प्रसिध्दीसाठीच्या आणि मतपेढीसाठीच्या लाडक्या योजनांनी राज्याला कंगाल केले आहे महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना ज्यावेळी सरकारने जाहीर केली होती त्याचवेळी त्यासाठी पुरवणी मागण्यांमधून तरतूद करावी लागणार हे स्पष्ट होते मुळात ज्या राज्याचा मुळ अर्थसंकल्प तुटीचा आहे कर्ज काढून राज्य चालविण्याची वेळ आलेली असून कर्जाचा डोंगर वाढत आहे त्या राज्यात अर्थसंकल्पा बाहेर जाऊन पुरवणीच्या जोरावर किती योजना राबवाव्यात याला काही मर्यादा असतात पुरवणी मागण्या या अचानक उद्भवणाऱ्या तातडीच्या खर्चासाठी करणे समजू शकते माञ एकाच योजनेसाठी हजारो कोटींची तरतूद पुरवणी मागणीतून केल्यानंतर राज्याचा आर्थिक गाडा घसरणार होता हे तर निश्चितच आता तेच पहायला मिळत आहे लाडकी बहीण आणि मतांवर डोळा ठेवून आखलेल्या तत्सम योजनांसाठी वेगवेगळ्या ठिकाणचा निधी



वळविला जात आहे मागच्या काही काळात बांधकाम विभागाचा निधी हडपण्यात आला तिर्थक्षेत्र पर्यटन या विभागांना द्यायला सरकारकडे पैसा नाही ग्रामविकासची कामे कोणत्याही क्षणी ठप्प पडतील अशी परिस्थिती आहे वेगवेगळ्या विभागांमधून सध्या शेकडो हजारो कोटींच्या कामांना मंजुरी दिली जाते माञ आर्थिक तरतूद होणार का? यांची शाश्वती कोणालाच नाही एकीकडे हे सुरू असतानाच राज्यातील सत्ताधारी माञ योजना बंद होणार नाही राखी पौर्णिमेची ओवाळणी देऊ आता बहीणींना भाऊबिजेची ओवाळणी देऊ अशा घोषणा करत आहेत अर्थ विभागाच्या अधिकाऱ्यांनी यापूर्वीच महाराष्ट्राची अवस्था किती कंगाल झाली आहे ते सांगितले आहे अशा परिस्थितीत राज्य चालवायचे तर करवाढ हा एकमेव मार्ग सरकारकडे असतो आणि सरकार सध्या तेच करत आहे उत्पन्नाचे इतर स्ञोत मर्यादित आहेत जीएसटीचे संकलन वाढविले असे गृहीत धरले तरी केंद्राकडून त्याचा वाटा मिळणार किती आणि कधी? हा प्रश्न असतोच त्यामुळे आता राज्याच्या अंतर्गत असलेल्या विषयांमधून जिझीया वसुलीचा सपाटा सरकारने लावला आहे मुद्रांक शुल्क वाढ हा यांचा मोठा पहिला फटका आहे नोटरी किंवा इतर गोष्टींसाठी पूर्वा शंभर रुपयांच्या मुद्रांकावर व्यवहार व्हायचे आता ते मुद्रांक शुल्क सरकारने थेट पाचशे रुपये केले आहे म्हणजे भाऊजीच्या घरावरचे पञे विकण्याची वेळ आणायची आणि त्यातूनच बहिणीला ओवाळणी टाकायची असला उरफटा न्याय सध्या राज्यात सुरु आहे मागच्या महिनाभरात वेगवेगळ्या गोष्टीवरचे शुल्क छुप्या पद्धतीने किंवा जाहीर पध्दतीने वाढविले जात आहे महागाई वाढत आहे खाद्य तेलाचे दर वाढले पिठाचे दर वाढले वेगवेगळ्या वस्तुंवर कर किंवा अधिभार वाढवून सामान्यांना लुटून राज्य चालविण्याची वेळ सत्ताधाऱ्यांवर आली आहे त्यामुळे मोफतच्या योजना काही लोकांना सुखावत असल्या तरी एकीकडे शंभर रुपयांची योजना दाखवून दुसरीकडे सामान्यांच्या खिशातील हजार रुपयांवर दरोडा टाकण्याचे काम सरकारी धोरणांमधून होत आहे

**-प्रशांत बाफना/अहमदनगर**
**प्रतिनिधी ८०५५४४०३८५**

## जनतेला विश्वास राजेसाहेब समृद्धी आणणार

# सर्वसामान्य माणूस म्हणतोय;परळी मतदारसंघात शांतता व प्रगती हवी तर राजेसाहेब देशमुखांशिवाय पर्याय नाही

**परळी वै. | प्रतिनिधी**

परळी विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख हे आपल्या शेकडो समर्थकांसह महाविकास आघाडीच्या प्रमुख नेते व पदाधिकारी यांना सोबत घेऊन रविवारी आणि सोमवारी ग्रामीण भागात झंझावाती प्रचार दौरा करीत आहेत. सर्वसामान्य नागरिक, महिला व युवकांचा त्यांना सर्वत्र मिळणारा उदंड प्रतिसाद पाहून सर्वसामान्य माणूस म्हणतोय की, परळी मतदारसंघात शांतता व प्रगती हवी असेल तर राजेसाहेब देशमुखांशिवाय पर्याय नाही. यावेळी परळी शहरासह ग्रामीण भागात तुतारी वाजणार आहे. परळी विधानसभा मतदारसंघातील जनतेला विश्वास आहे. की, राजेसाहेब देशमुख हेच मतदारसंघात समृद्धी आणणार आहे.



अंबाजोगाई तालुक्यातील नवाबवाडी, मुरंबी, चोथेवाडी, घोलपवाडी, खजेवाडी, लिमगाव तांडा, उजणी,जोडवाडी, दरडवाडी, कातकरवाडी, मुरकुटवाडी, कांगणेवाडी या गावात प्रचार दौरा केला. या सर्व ठिकाणी जनतेने जोरदार स्वागत केले. महाविकास आघाडीच्या सर्व कार्यकर्त्यांनी परळी विधानसभा मतदारसंघात नेहमीप्रमाणेच एकजूट दाखवून लोकसभेप्रमाणेच पुन्हा एकदा विजय खेचून आणावा आणि राजेसाहेब देशमुख यांना विजयी करावे, असे आवाहन ॲड.माधव जाधव यांनी केले.

प्रचारादरम्यान राजेसाहेब देशमुख यांनी परळी शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांच्या आणि मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या. त्यांच्या समस्या, अडी अडचणी जाणून घेतल्या. या निवडणुकीत परळी मध्ये सकारात्मक बदल घडविण्यासाठी मतदान करण्याचे आवाहन केले. परळीच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सध्या परळीत चालू असलेल्या गुंडगिरीला कायमचे संपविण्यासाठी सर्वसामान्य जनता आता ठाम निर्णय घेत आहे. सुरक्षितता, विकास आणि प्रगतीचा मार्ग मोकळा करण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची वेळ आली आहे. येणाऱ्या निवडणुकीत परिवर्तन घडवून परळीला सकारात्मक बदल आणि सुरक्षित वातावरण मिळवून देण्याचा निर्धार आहे. परळी विधानसभा मतदारसंघात तरूण वर्गाच्या हाताला रोजगार नाही, बेरोजगारी प्रचंड प्रमाणात वाढली आहे. ग्रामीण भागात दर्जेदार रस्ते, शिक्षण, आरोग्य विषयक मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत. महिला-भगिनी सुरक्षित नाहीत. शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, श्रमजीवी, कामगार, विद्यार्थी हे सर्व समाज घटकविकासा पासून कोसो दूर आहेत. त्यामुळे परळी विधानसभा मतदारसंघाचे हे चित्र बदलायचे असेल, या मतदारसंघातील दहशत व अराजकता संपविण्यासाठी परळी विधानसभा मतदारसंघातील सर्वसामान्य माणसाने आमच्या पाठीशी उभे रहावे, निर्भयपणे तुतारी वाजविणारा माणूस या निवडणुक चिन्हासमोरील बटन दाबून, परळी मतदारसंघाच्या उज्ज्वल भविष्यासाठी मला प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन परळी विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी केले आहे.

सभेपुर्वी काढण्यात आलेल्या जनसंवाद यात्रेस जनतेचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.

---

### हक्काची सत्ता आणण्यासाठी महायुतीला विजयी करा

## मुंदडा यांच्या पाठीशी मतदानरुपी आशीर्वाद उभे करा प्रितमताईंचे मतदारांना आवाहन

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

राज्यात आपल्या हक्काची असलेली महायुतीची सत्ता आणण्यासाठी महायुतीच्या उमेदवार नमिता मुंदडा यांच्या पाठीशी मतदानरुपी आशीर्वाद उभे करा, त्यांना दिलेले प्रत्येक मत हे पंकजाताई मुंडे यांचे बळ वाढवणारे आहे. महायुती सरकारच्या माध्यमातून पुढचे पाच वर्षे मतदार संघाची इमाने इतबारे अविरत सेवा करू अशी ग्वाही माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी मतदारांना दिली.

अंबाजोगाई तालुक्यातील प्रचार दौऱ्यानिमित्त विविध गावांना भेटी देऊन मतदारांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या.



केज विधानसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या उमेदवार नमिता मुंदडा यांच्या प्रचारानिमित्त डॉ. प्रितमताई मुंडे यांनी सलग दोन दिवस झंझावाती दौरा करत मतदारसंघ पिंजून काढला. या दरम्यान ठिकठिकाणी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. महायुतीच्या उमेदवार नमिता मुंदडा, अक्षय मुंदडा यांच्यासह स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते यादरम्यान उपस्थित होते.

होत असलेली विधानसभा निवडणुक ही दुरगामी परिणाम करणारी आहे. आपल्याला केवळ आपला प्रतिनिधी निवडायचा नसून येणाऱ्या पिढीचे भवितव्य घडवणारा, त्यांच्या भवितव्याला योग्य दिशा देणारा हक्काचा आमदार आपल्याला निवडायचा असल्याचे डॉ. प्रितमताई मुंडे म्हणाल्या. राज्यातील सर्वसामान्यांच्या हितासाठी लाडकी बहीण, वीज बिल माफी, मोफत अन्नधान्य' अशा विविध लोकोपयोगी योजना राबवणारे महायुतीचे सरकार आपल्याला पुन्हा एकदा सत्तेत आणायचे आहे, आणि म्हणून आपल्या हक्काचा उमेदवार आणि हक्काची सत्ता आणण्यासाठी, मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुन्हा एकदा महायुतीचा उमेदवार विधानसभेत पाठवा, येणारे पाच वर्षे आपल्या विकासाचे आणि उज्वल भवितव्याचे असतील. मागील पाच वर्षांपासून आम्ही या मतदारसंघासाठी प्रामाणिकपणे काम करत आहोत, पुढील काळात देखील आपल्या सेवेत खंड पडू देणार नाही अशी ग्वाही सर्वांना देते' अस डॉ. प्रितमताई मुंडे आपल्या भाषणादरम्यान म्हणाल्या.

---

## आज अंबाजोगाईत आ.रोहित पवार व राजे भूषणसिंह महाराज होळकर यांच्या जाहीर सभेचे आयोजन

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

केज विधानसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारार्थ आज अंबाजोगाई येथे आ. रोहित दादा पवार व राजे भूषणसिंह महाराज होळकर यांच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या जाहिरसभेस मतदारसंघातील नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे.केज विधानसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार पक्ष व महाविकास आघाडी चे उमेदवार पृथ्वीराज शिवाजीराव साठे यांच्या प्रचारार्थ महाराष्ट्राची बुलंद तोफ आमदार रोहित पवार यांची जाहीर सभा आज दि.१६ नोव्हेंबर शुक्रवार रोजी दुपारी २ वाजता वेणूताई चव्हाण महिला महाविद्यालय, बस स्टॅन्ड समोर, अंबाजोगाई या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे.





आ. रोहित पवार व राजे भूषणसिंह महाराज होळकर यांच्या जाहीर सभेस सर्व मतदार बंधू, महिला तसेच महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी मित्रपक्ष यांच्यासह मतदार बंधूनी उपस्थित राहावे असे आवाहन केज-अंबाजोगाई महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे.

---

## ओबीसी ने सांभाळली अनिल दादा जगताप यांच्या प्रचाराची धुरा

**बीड | प्रतिनिधी**

आज नवगण राजुरी येथून गणरायाचे दर्शन घेऊन अनिल दादा जगताप यांना पाठिंबा जाहीर करत विविध ओबीसी समाज संघटनानीं अनिल दादा जगताप यांना जाहीर पाठिंबा दिला.

अनिल दादा जगताप यांची मनोज दादा जरांगे पाटील यांचे कट्टर समर्थक व मराठा आंदोलक तथा सर्व सामान्य जनतेचा हक्काचा माणूस अशी ओळख प्रचलित असलेले विधानसभा उमेदवार असून

सध्या परिस्थितीत बीड विधानसभेसाठी अनेक उमेदवार आपले नशीब आजमावित असताना जाती-जातीत तेढ निर्माण करण्याचे काम क्षीरसागर कुटुंबाकडून जाणीवपूर्वक केले जात आहे या सर्वाला चाप म्हणून , सर्व समाजाला सोबत घेऊन चालणारे नेतृत्व म्हणून सर्व परिचित असलेले



उमेदवार अनिल जगताप यांना ओबीसीतील विविध समाजातील लोकांनी निवडून आणण्यासाठी आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे .

बीड विधानसभा मतदारसंघातील शहर, खेड्यापाड्यात जाऊन सर्वांनी आपापल्या समाजातील समाज बांधवांना अनिल दादा जगताप यांना निवडून देण्यासाठीएकजुटीने मतदान करावे अशी आग्रहाची विनंती करत प्रचाराची धुरा ओबीसी समाज बांधवांनी सांभाळली आहे. ओबीसी समाजाने घेतलेल्या या भूमिकेमुळे अनिल दादा जगताप यांची बाजू भक्कम झाली असून विजय निश्चित मानला जात असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

याप्रसंगी माळी समाजाचे लक्ष्मण दादा ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली ओबीसी क्रांति परिषद राष्ट्रीय अध्यक्ष किरण चव्हाण, आलोक फटाले, मनोज उर्फ राजाभाऊ चव्हाण, नावी समाज मधुकर वैद्य, संजीव भारती हे परिश्रम घेत आहेत.

---

## चिचखंडी येथील धनगर समाजाच्या वतीने पृथ्वीराज साठेंना ११,१११ रुपयांची आर्थिक मदत

### उमराई येथील ग्राम पंचायत सदस्यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात जाहीर प्रवेश

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील चिचखंडी येथील धनगर समाज बांधवाकडून पृथ्वीराज साठेंना ११,१११ (अकरा हजार एकशे अकरा) रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली. धनगर समाजाच्या वतीने लोकवाटा जमा करून एक सर्वसामान्य व सर्वसाधारण उमेदवार म्हणून सर्वदूर सुपरिचित असलेले महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना ही आर्थिक मदत करण्यात आली. विद्यमान आमदारांच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या हुकूमशाही, दडपशाही व एकाधिकार शाहीला संपूर्ण मतदारसंघ कंटाळला असल्याने येनत्या प्रकाराने यावेळी बदल घडवायचाच असा चंग जणू केज मतदार संघातील मतदारांनी बांधला असल्याचे दिसून येत आहे. गेल्या आठवड्यात जयंत पाटील यांच्या उपस्थितीत



केज येथील शेतकऱ्यांने मोठी अर्थिक मदत केली होती. यावरुन या विधानसभेला तुतारी वाजणारच अशी लोकभावना सर्वत्र निर्माण झाली आहे.

अंबाजोगाई तालुक्यातील मौजे उमराई येथील ग्रामपंचायत सदस्य शिवाजी सुग्रीव केंद्रे, त्रिंबक मुळे, सर्जेराव शिंदे,शिवाजी दगडू केंद्रे यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश झाला. पक्ष प्रवेशावेळी युवा नेते दिपक शिंदे,तानबा लांडगे, अनंत अंजाण, रमेश आबा कदम, विशाल जहागीरदार व ईतर मान्यवर उपस्थित होते.

---

## माजलगाव विधानसभा मतदारसंघातील उमेदवार प्रा.ईश्वर मुंडे किर्तनाच्या फडात

**किल्ले धारूर | प्रतिनिधी**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणूकीची धामधूम चालू आहे तसी माजलगाव मतदार संघात ही सर्व उमेदवारांसह कार्यकर्त्यांची धावपळ चालू आहे परंतू आवड आसली की सवड मिळते म्हणतात याचा प्रत्यय काल सर्वांना आला.

माजलगाव विधानसभा मतदार संघातील अपक्ष उमेदवार प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे गांजपूरकर हे रूई धारूर येथे किर्तनाच्या फडात सर्वांना दिसून आले.रूई धारूर येथील राजेंद्र काकडे व महारूद्र भोसले यांच्या आत्या स्व.गजराबाई मुकुंद हांडगे यांच्या प्रथम वर्ष श्राध्दा निमित्त दि.१४ नोव्हेंबर २०२४ गुरूवार रोजी ह.भ.प.प्रा.ईश्वर मुंडे महाराज गांजपूरकर



यांच्या किर्तनाचे नियोजन एक महिन्यापूर्वीच केलेले होते.निवडणूकीच्या धामधूमीत स्वत: अपक्ष उमेदवार असलेले प्रा.ईश्वर मुंडे सदरील किर्तन सेवेसाठी वेळ देतील किंवा नाही या बाबत संभ्रम निर्माण झालेला होता परंतू निवडणूका येतील,निवडणूका जातील पण आपला सांप्रादायीक सेवेतील भाव व आपल्या प्रेमाच्या माणसांतील आपलेपणा टिकून राहावा म्हणून प्रा.ईश्वर मुंडे यांनी राजकारणाचा फड सोडून किर्तनाच्या फडात सेवा देण्यास प्राधान्य दिले.संत तुकाराम महाराज यांच्या नको नको मना गुंतू माया जाळी।काळ आला जवळी ग्रासावया या अभंगावर अभ्यासपूर्ण किर्तन केले.त्यांना प्रा.राम नांदूरे यांनी मृदंगाची साथ दिली तसेच ह.भ.प.दत्तात्रय कदम महाराज,शिवाजी गायके महाराज,चंद्रहार गायकवाड,हनुमंत तिडके,धनराज सोळंके,सुमित भोसले यांनी गायनाची साथ केली.मनोज खिंडरे यांनी किर्तनाचे स्वर या युट्यूब चॅनलवर टेलीकास्ट केले.

प्रा.ईश्वर मुंडे यांनी राजकारणापेक्षा सांप्रादायीक सेवेला महत्व दिल्यामुळे मतदार संघातील लोकांच्या मनात त्यांच्या विषयी आदर वाढला आहे.

---

## महाउपासिका मिराताई आंबेडकर यांनी बजावला मतदानाचा अधिकार

### मुंबईतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजगृह येथून केले मतदान

**मुंबई | प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांच्या मातोश्री महाउपासिका मिराताई आंबेडकर यांनी आज विधानसभा निवडणुक २०२४ मधील मतदानाचा अधिकार राजगृह, मुंबई येथून बजावला आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींना घरीच मतदान (गृहमतदान) करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

गृहमतदान प्रक्रियेचा म्हणजे एकप्रकारचे मतदान केंद्रच होय. या मतदान प्रक्रियेत मतदान केंद्राध्यक्ष, मतदान केंद्र अधिकारी, एक शिपाई आणि बंदोबस्ताला पोलिस असे हे पथक असते. हे पथक मतदाराच्या घरी पोहोचल्यानंतर त्यांना आपण कोण आहोत आणि कशासाठी आलो आहोत, याची माहिती देतात. मतदान केंद्रावर होणाऱ्या प्रक्रियेप्रमाणेच संपूर्ण प्रक्रिया पार पाडली जाते.




मतदान केंद्राप्रमाणेच येथेही मतदान प्रक्रिया पूर्णपणे गोपनीय पद्धतीने पार पाडली जाते. त्यामुळे मतदानाची गुप्तता कायम राहते. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मतपत्रिका दोन पाकिटांत बंदिस्त करून मतपेटीत टाकली जाते.

# आम्ही बहिनीनां पैसेच नाही तर सुरक्षा सुद्धा देणार-ठाकरे

## श्रीगोंद्यात ठाकरेंची ऐतिहासिक सभा उच्चांकी गर्दी





**श्रीगोंदा । दत्ता पाचपुते**

लोकसभा निवडणुकीत भाजपा सरकारला मोठ्या प्रमाणात देशात अनेक ठिकाणी पराभव पत्करावा लागल्यानेच त्यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणली पण आम्ही लाडक्या बहिणींना नुसते पैसे नाही तर महिलांना सुरक्षा कवच पण देऊ असे आश्वासन शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे श्रीगोंदा येथील जाहीर बोलताना दिले आहे

दि १४ रोजी श्रीगोंद्यातील महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार अनुराधा नागवडे यांच्या प्रचारार्थ शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांची शेख महंमद महाराज प्रांगणात जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी बोलताना ठाकरे म्हणाले कि श्रीगोंद्यातील साजन पाचपुते यांच्यासाठी महायुतीकडे उमेदवारी मागितली होती. मात्र साजनने मनाचा मोठेपणा दाखवून अनुराधा नागवडे यांना दिली. त्यामुळे आमदार मी नाही तर पक्षाचा पाहिजे हि भूमिका त्यांनी बजावली श्रीगोंद्यातील शकुनी मामा आणि त्यांची माजलेली मांजरे यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी केली आहे. त्यांच्या उमेदवारीने महाविकास आघाडीला काही फरक पडणार नाही. कारण लोकसभा निवडणुकीत मोदी - शहा यांनी महाराष्ट्रात येऊन वेगवेगळी आमिषे दाखवली परंतु त्यांचा निभाव लागला नाही. त्यामुळे अनेक ठिकाणी पराभव झाला आज श्रीगोंद्यात ४० वर्षांपासून अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. साकळाई कुकडी घोड पाण्याचा प्रश्न प्रलंबित आहेत. त्यावर आजपर्यंत तोडगा निघाला नाही. आता ते म्हणतात बोगदा करू पण त्यांनाच मतदान केल्यास तुमच्या आयुष्याचा बोगदा होईल पण प्रश्न सुटणार नाही. त्यामुळे अनुराधा नागवडे यांना विजयी करा प्रश्न निकाली काढू आज भाजपाला साखर कारखाने आजारी पाडून मोदी शहा याना अदानी- अंबानी या मुगळ्यांच्या घश्यात घालायचे हे भाजपचे गणित आहे. भाजपचे नेते जातात तिकडे खातात त्यांनी अनेक उद्योग धंदे गुजरातला पळविल्याने आपल्याकडे बेरोजगारी वाढली आहे. शिवाजी महाराज्यांच्या पुतळ्यात पैसे खाणाऱ्यांना जनता निवडून देणार नाही. आम्ही राज्यात प्रत्येक ठिकाणी नागपूर सुरत यासह अनेक ठिकाणी शिवमंदिरे मंदिरे बांधणार असेही त्यांनी जनतेला संबोधित केले. ते पुढे बोलताना म्हणाले कि आज महाराष्ट्रात महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. बदलापूर प्रकरणात पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी बारा तास बसविले त्यामुळे महिलांना पोलीस ठाण्यात जाण्याची भीती वाटते. म्हणून महिलांची सुरक्षा धोक्यात आहे. आज लाडक्या बहिणीला दीड नाही तर आम्ही तीन हजार देणार पण पैश्याबरोबर सुरक्षेची हमी देणार आहे. असेही ठाकरे म्हणाले ते म्हणाले शेतकरी अडचणीत आहे, तुम्हाला शेतकऱ्याला मदत करायची आहे तर खते कीटकनाशके यासह शेतकऱ्यांना लागणाऱ्या सर्व वस्तूवरील जीएसटी हटवा तसेच जीवनावश्यक वास्तूचे दर कमी करा. अशी मागणी त्यांनी केली आहे. मुलींच्या बरोबरीने मुलांना पण मोफत शिक्षण देऊ असे बोलताना ठाकरे यांनी सांगितले. यावेळी माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले कि राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे. महाविकास आघाडीचा मी एक सच्चा कार्यकर्ता आहे. माझा सख्खा भाऊ विरोधात उभा राहिला तरी सुध्दा विरोधात प्रचार करेल त्यामुळे बंडखोरी करणार नाही. त्यासाठी श्रीगोंदा मतदार संघात राहुल जगताप यांनी अपक्ष उमेदवारी केलीय पण अजूनही वेळ गेलेली नाही. त्यांनी मनाचा मोठेपणा दाखवून नागवडे याना पाठिंबा देऊन मतविभाजन टाळावे असेही थोरात म्हणाले.यावेळी खासदार फौजिया खान,मिलिंद नार्वेकर,शुभानअली शेख,बाळासाहेब थोरात,शशिकांत गाडे, राजेंद्र नागवडे,यासह जिल्ह्यातील अनेक महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते त्यावेळी अथांग जनसागर उसळला होता कार्यक्रमाच्या शेवटी शिवसेना उपनेते साजन पाचपुते यांनी आभार मानले

# आ.जगताप यांनी आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना बळ देण्याचे काम केले-काळे

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

महायुतीत घटक पक्ष असलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आठवले) वतीने भिंगार शहरात नगर शहर विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार आ. संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ बैठका व प्रचार सुरु करण्यात आला आहे. भिंगार येथील रिपाईचे पदाधिकारी व कार्यकर्ते आ. जगताप यांना निवडून आणण्यासाठी एकवटले असून, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचाराने कार्य करणारे आ. जगताप यांना निवडून आणण्यासाठी आंबेडकरी जनतेला आवाहन करण्यात आले.



भिंगार येथील पंचशील नगर मध्ये भिंगार शहरातील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेत्यांची बैठक पार पडली. यावेळी राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष सुरेश बनसोडे, आरपीआयचे अमित काळे, कॅन्टोन्मेंट बोर्डाचे माजी उपाध्यक्ष सुनिल काळे, ज्येष्ठ नेते सुनिल शिंदे, आरपीआयचे नाना पाटोळे, मंगेश मोकळ, महेश भिंगारदिवे, गौतम कांबळे, दया गजभिये, विक्रम चौहान, सुजित घंगाळे, माजी सरपंच युवराज पाखरे, सिध्दार्थ आढाव, समीर भिंगारदिवे, अंकुश मोहिते, रुपचंद छजलाने, सोनू माघाडे, पूजा पाठक, शारदा ठाकूर आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुरेश बनसोडे म्हणाले की, आंबेडकरी समाजाला सन्मान व न्याय देण्याचे काम आ. संग्राम जगताप यांनी केले. शहरात त्यांच्या पुढाकाराने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा साकारला जात आहे. त्याचप्रमाणे त्यांनी शहरात इतर महापुरुषांचे पुतळे देखील उभारले. भिंगारमध्ये देखील समाजबांधवांनी जागा उपलब्ध करुन दिल्यास बाबासाहेबांचा पूर्णाकृती पुतळा आ. जगताप यांच्या प्रयत्नाने उभा राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अमित काळे म्हणाले की, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना बळ देण्याचे काम आ. संग्राम जगताप यांनी केले. समाजाच्या प्रत्येक प्रश्नासाठी ते धावून आले आहेत. आंबेडकरी समाजाचा सन्मान वाढवून त्यांनी कार्यकर्त्यांना संधी देण्याचे काम केले. त्यांनी कधीही जाती-पातीचे राजकारण केले नसून, सर्व बहुजन समाजाला बरोबर घेऊन शहर व उपनगरांचा विकास साधला असल्याचे स्पष्ट केले. सुनील शिंदे यांनी आ. जगताप यांनी शहराला विकासाचे व्हिजन दिले असून, त्याप्रमाणे विकासात्मक कामे मार्गी लागत आहे. ते पुन्हा आमदार झाल्यास शहराच्या विकासाला गती मिळणार असल्याचे सांगितले.

# विरोधकांच्या खोट्या प्रचाराला नागरिक थारा देणार नाही-आमदार मोनिका राजळे

**शेवगाव । प्रतिनिधी**

ताजनापुर योजनेवर चर्चा सुरु केली की समजून जायचे निवडणूक आली आहे. निवडणूक प्रचारात गावासाठी काय दिले, काय करणार हे न सांगता, जातीपातीचे राजकारण सुरु करायचे. त्यांच्याकडे विकासकामांचे मुद्दे नसल्याने, विकासाच्या मुद्द्याला बगल द्यायची, दहा वर्षात तालुका मागे पडला म्हणायचा, जर तुम्ही दहा वर्षात मतदारसंघात फिरले असते तर विकास कामे दिसली असती. तुमच्या खोट्या प्रचाराला नागरिक थारा देणार नाही असे प्रतिपादन आमदार मोनिका राजळे यांनी केले आहे.



आमदार राजळे यांनी तालुक्यातील ठाकूर निमगाव, कुरुडगाव रावतळे, वरुर, भगुर, आव्हाणे, दिंडेवाडी, बऱ्हाणपुर, मळेगाव, भातकुडगाव, आखतवाडे, आपेगाव, गरडवाडी, ढोर जळगाव, सामानगाव, लोळेगाव आदी गावातील नागरिकांशी संवाद साधला. वरुर येथे झालेल्या कार्यक्रमात दिनकर अंचवले महाराज, भिमराव फुंदे, सचिन म्हस्के, भानुदास सोनटक्के, मारुती लव्हाट, विठ्ठल झिरपे, केशव म्हस्के, गणपत शिंदे, संजय देवडकर, संजय मोरे, बाबासाहेब धायतडक, प्रकाश म्हस्के, भागवत झिरपे, भाऊसाहेब वावरे, किसन म्हस्के, संजय मोरे, दीपक भुसारी, बापुनाना पिसोटे, रवींद्र वायकर, आशाताई गरड, मारुती खांबट, गणेश म्हस्के, अंबिका लव्हाट, अजिंक्य लव्हाट, आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलतांना राजळे म्हणाल्या, कारखान्याला मदत हवी होती, त्यावेळी अजितदादांच्या गटात आले. दिडशे कोटी रुपये निधी मिळाला, लगेच पलटी मारली. त्यांनी देखील यापूर्वी तालुक्याचे प्रतिनिधित्व केले, त्यांच्या कार्यकाळात बसस्थानक, शहर पाणी योजना, ताजनापुर योजना, रस्ते, आदी प्रश्न होते. इतक्या वर्षापासून महिलांचे पाण्यासाठीचे सुरु असलेले हाल त्यांना दिसले नाहीत. मी महिला असल्याने त्यांचे दु:ख वेदना मला जाणवल्या त्यामुळे प्राधान्याने पाणी प्रश्नावर पाठपुरावा करुन पाणी प्रश्न मार्गी लावला. बसस्थानक, विविध रस्त्यांचे कामे मार्गी लावली. त्यावेळी त्यांना हे प्रश्न मार्गी लावण्यासाठी कोणीही अडवले नव्हते. प्रत्येक गावात किमान एक कोटी निधी देऊन विविध प्रश्न मार्गी लावले. क्वचित एखाद्या गावाला कोटी पेक्षा कमी निधी मिळाला असेल. पण भेदभाव न करता जनतेचे हित लक्षात घेऊन कामे केल्याचे आमदार मोनिका राजळे म्हणाल्या.

# ओवाळणीची परत फेड म्हणून लाडक्या संग्राम भैय्या साठी असंख्य बहिणी प्रचाराच्या मैदानात

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

महायुतीचे उमेदवार आपले लाडके भाऊ आ.संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ विविध क्षेत्रातील महिला प्रचाराच्या मैदानात उतरल्या आहेत. आ.जगताप यांच्या भगिनी डॉ.वंदना फाटके, माजी नगरसेवक सुभाष लोंढे यांच्या पत्नी माधुरी लोढे, अरुणा गोयल, अशा निंबाळकर, प्रिया जानवे, शितल लोंढे आदींसह महिलांनी गुरुवारी शहरातील विविध भागांमध्ये जाऊन मतदारांच्या भेटी घेतल्या. या प्रचार फेरीत मोठ्या संख्यने महिला पदाधिकारी व नागरिक सहभागी झाले होते.

या प्रचार फेरीत डॉ.वंदना फाटके यांच्यासह महिलांनी नागरिकांच्या वैयक्तिक भेटी घेवून त्यांना प्रचार पत्रकांचे वाटप करून आ.संग्राम जगताप यांनी केलेल्या कामाची माहिती देऊन त्यांना मतदान करण्याचे अवाहन केले.

विश्वास जुना...संग्रामभैय्या पुन्हा

अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या.

डॉ.वंदना फाटके म्हणाल्या, की आ.संग्राम जगताप हे केवळ माझेच बंधू नसून सर्व लाडक्या भगिनींचे लाडके बंधू आहेत. त्यांच्या माध्यमातून शहरातील हजारो भगिनींना मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळाला आहे. तसेच गेल्या १० वर्षात शहरातील सर्व भागातील जनतेला चांगल्या सुविधा मिळण्यासाठी विकासकामांच्या माध्यमातून स्थानिक प्रश्न सोडवले आहेत. त्यामुळे या निवडणुकीत त्यांना महिला भगिनींसह सर्व जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याने आ.संग्राम जगताप यांचा विजय निश्चित आहे.माधुरी लोंढे म्हणाल्या की, राज्यातील महायुती सरकारने कमी काळात महिलांसाठी खूप काही केले आहे. एसटी बस मध्ये अर्धे तिकीट, लाडकी बहिण योजना या माध्यमातून महिलांना न्याय दिला आहे. शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातूनही महिलांना या योजनांचा लाभ मिळत असून ते नागरिकांसाठी सतत उपलब्ध असतात.

माजी नगरसेवक सुभाष लोंढे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या प्रचार फेरीत संभाजी लोंढे, किशोर डागवाले दिनेश लोंढे, मनोज लोंढे, बाळासाहेब भुजबळ, आकाश दळवी, अभिजीत भिंगारदिवे, उदय खरमाळे, राजू शिंदे, रोहन डागवाले, भारतीय जनता पक्षाच्या सरचिटणीस सरीता कोटा, सारिका दासरी, सुजाता कदम, संगीता पठारे, सुहास पाथरकर, आप्पासाहेब तारू महेश लोंढे यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077